## संपादकीय

'नवज्योत' या संशोधन क्षेत्रात अविरत कार्यरत असणाऱ्या आंतरराष्ट्रीय, आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेच्या त्रैमासिकाचा सप्टेंबर महिन्याचा अंक हा संशोधक, प्राध्यापक, अभ्यासक व वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाने एकीकडे जवळपास संपूर्ण जगच टाळेबंद झाल्याचे आपण अनुभवत असतांना दुसरीकडे जगाला महामारीच्या धसक्यातून वाचविण्यासाठी तज्ज्ञ, संशोधक रात्रंदिवस लस व औषधे शोधण्यात प्रयोगशाळांमध्ये गुंतले आहेत. कोव्हिड-१९ च्या महामारीने अखिल मानवजातीची अगदी दारूण अवस्था केली आहे. त्यामुळे लहानांपासून–थोरांपर्यंत व्यक्तीची विमनस्क झालेली मनोअवस्था नीट होण्यासाठी नवनिर्माण, नवोन्मेषी सिद्धांत निर्मितीची जबाबदारी ही विशेषतत्वाने सामाजिक शास्त्रे व मानव्यविद्या शास्त्रांची आहे हे निर्विवाद येवून पडते.

कोव्हिड-१९ च्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर भारतासारखे अनेक देश अजूनही दुसऱ्या व काही देश तिसऱ्या लाटेचा व टाळेबंदीचा सामना करित असताना 'नवज्योत' चा अंक प्रकाशित होणे हे कार्य म्हणजे एक प्रकारचे दिव्यच म्हणावे लागेल. खरेतर आर्थिक व मानसिक घडी पूर्णपणे विस्कटल्याच्या या काळात ती घडी नीट किंबहुना पूर्ववत तरी करण्याची महत्वाची जबाबदारी संशोधनकर्त्या लेखकांवर येवून पडते.

प्रस्तुत 'नवज्योत' या अंकाचे वैशिट्य म्हणजे समाजाच्या वर्तमान समस्या व प्रश्नांवर ऐतिहासिक आणि समकालीन वस्तुनिष्ठ तथ्यांवर व शास्त्रीय पद्धतींवर आधारीत केलेले लिखाण होय. शोधकर्त्या लेखकांनी आपल्या शोधकार्यात विभिन्न विषय हाताळले असून आपल्या विषयाची मांडणी वस्तुनिष्ठपणे तथ्यावर केलेली दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने 'Diasporic Identity in Monika Ali's Brick Lane' या लेखामध्ये मोनिका अली लिखित ब्रिक लेन मधील 'डायस्पोरीक ओळख' च्या संदर्भात आलेली मांडणी ही जगभर स्थलांतरीतांच्या बिकट होत जाणाऱ्या प्रश्नांबाबत निश्चितपणे तमाम साहित्य क्षेत्रातील शोधकर्ते, लेखकांसह वाचकांच्या भावविश्वाला हात घालणारी आहे. संयुक्त राष्ट्राची मानव अधिकारांची सनद असो वा भारतीय संविधान, याद्वारे त्यातील तरतुदींच्या आधारे समाजातील लिंगावर आधारित भेदभाव संपुष्टात आणला गेला आहे. असे असले तरी आजच्या घडीला जगातील असा कोणताही देश लिंगावर आधारित भेदभावाला अपवाद करता येणार नाही. भारतासारख्या देशात तर शेकडो वर्षांपासून लिंगाधारित भेदभावाची धर्मशास्त्रावर आधारित 'ग्रांथिक विण' किती अभेद्य आहे, याचा अनुभव आपण घेत आहोत. या संदर्भात 'A Study of Sex Disparity in India' या शोध लेखात आलेली समाजशास्त्रीय मांडणी ही निश्चितच भारतीय समाजाच्या 'लिंग भेद' वास्तवाला समोर आणणारी आहे. 'Right to Life of fetus' हा लेख भ्रूणाच्या जीवन जगण्याच्या अधिकाराला अधोरेखित करणारा आहे. आज आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून भ्रूणहत्या विशेषतः स्त्रीभ्रूण हत्येचे वाढते प्रमाण मानवतेला काळीमा फासणारे आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेख हा भ्रूणाच्या जीवन अधिकारांबाबत दिशादर्शक म्हणावा लागेल. जगाच्या पाठीवर एकमेव 'जातीस्थान' कुठे आणि कोणते असेल ? तर ते म्हणजे भारत. 'जी जात नाही, ती जात' 'जात किंवा अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे', इत्यादी इत्यादी. अशाप्रकारे जातीला परिभाषित करण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतानी केला. या प्रयत्नांचा भाग म्हणून 'तर्कतीर्थांची जातीविषयक मीमांसा' या लेखाकडे बघावे लागेल. जाती संस्थेकडे बघण्याचा व तिला समजून घेण्याचा वेगळा दृष्टीकोन हा या लेखाचा विशेष आहे. जात-धर्म-भाषा-संस्कृती या विविध घटकांवर आधारित वैविध्यपूर्ण असा हा भारतीय समाज याच घटकावर आधारित भेदभाव ग्रासित झाला आहे. अशा सर्व भेदभावाना हद्दपार करण्याकरिता संविधान प्रणित कायदा व न्याय व्यवस्था प्रस्थापित केली गेली आहे. परंतु आज वर्तमान भारताच्या न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता व विश्वासहर्येतेबाबत अनेकदा काही प्रश्नचिन्ह उभे होत असल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर 'मराठेकालीन न्यायपद्धती : स्वरूप व विकास' या लेखातील मांडणीचा तुलनात्मक दृष्टीकोनातून विचार व्हावयास हवा. खरेतर, 'नवज्योत' या प्रस्तुत अंकातील सर्व लेखांमधूनच समाजातील समकालीन समस्या व प्रश्नांशी निगडीत अनेक महत्वपूर्ण विषयावर शोधपूर्ण मांडणी झालेली आहे. 'नवज्योत' च्या अखंड व अविरतपणे चालणाऱ्या शोधकार्यास केवळ आपल्या मौलिक योगदानामुळेच अर्थपूर्ण सातत्य प्राप्त होत आले आहे. आपले मनस्वी धन्यवाद....

डॉ. सुखदेव उंदरे
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.